REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 10 | JULY - 2026

# “प्राथमिक शिक्षकांमधील व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास”

नागेश शिवाजी ढगे
पदवीधर शिक्षक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सालेगाव उत्तर तालुका लोहारा जिल्हा धाराशिव.

## संशोधनाची पार्श्वभूमी



जीवनात काहीतरी बनावं, काहीतरी करावं हे प्रत्येकाचचं स्वप्न असतं. याच अनुषंगाने आपण जीवनचरितार्थ चालविण्यासाठी आणि सोबत ध्येयसाध्यतेसाठी वा ज्ञानदानासाठी शिक्षकी व्यवसायात येतो. तरी परंतु,व्यवसायाचे ध्येय `ग्राहकाचे समाधान` हेच असते तर शिक्षकी व्यवसायाचे ध्येय `ग्राहकाचे समाधान` हेच हवे. त्यानुसार शिक्षकी व्यवसायातले ग्राहक म्हणजे `आमचे विद्यार्थी`. ते संतुष्ट आणि समाधानी असण्यासोबतच शिक्षकही समाधानी आहेत का?व्यवसायातून मिळणारी आत्मशांती तसेच व्यवसायानुरूप समाजात मिळणारा मानसन्मान, आर्थिक प्राप्ती याही गोष्टी शिक्षकी व्यवसायातून पुरेशा साध्य होतात का?शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानावर त्यांचे सेवा अनुभव, लिंग, शिक्षण या बाबींचाही परिणाम होतो का व कसे?अशा सर्व मूलभूत प्रश्नांनी संशोधकाला मागील नऊ ते दहा वर्षापासून भेडसावलेले आहे त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून व्यावसायिक समाधान विषयक इत्यंभूत प्रश्नाची उकल करण्याच्या उद्देशाने संशोधकाने हे संशोधन हाती घेतले होते.

**संशोधन शीर्षक :-** `` **प्राथमिक शिक्षकांमधील व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास.**``

## संशोधनाची उद्दिष्टये

1. प्राथमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
2. प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या सेवानुभवानुरुप व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
3. प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या शिक्षणानुरुप व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
4. प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे लिंग (शिक्षक वा शिक्षिका) घटकाच्या अनुषंगाने व्यवसाय समाधानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन कार्यपद्धती-**प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळातील असल्याने प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्याचे संशोधकाने ठरविले.

**संशोधन साधने-** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली हे साधन निवडलेले आहे.सदर प्रश्नावली ही डॉ.एस.के. सक्सेना यांनी मानसशास्त्रीय आधारावर तयार करुन प्रमाणित केलेली वस्तूनिष्ठ आणि विश्वसनिय अशी व्दिपर्यायी स्वरुपाची 29 प्रश्न असणारी सुटसुटीत स्पष्ट अशी हिंदी व इंग्रजी भाषेतून मुलत: तयार केलेले साधन आहे.

**जनसंख्या व नमुना निवड-** प्रस्तुत संशोधनात नमुना निवड करण्यासाठी संशोधकाने सहेतुक निवड पध्दती (Purposive Sampling) पध्दतीचा वापर केलेला आहे.या पध्दतीत संशोधक आपल्या उध्दीष्टांनुसार प्रतिसादक निवडतो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील पध्दतीने नमुना निवड केलेली आहे.

| संशोधनासाठी निवड | समाविष्ट केंद्र | केंद्रंातर्गत प्रतिसादक | एकूण प्रतिसादक |
|---|---|---|---|
| **जनसंख्या** | 13<br>(100 %) | सरासरी 40<br>(100 %) | 520<br>(100 %) |
| **नमुना निवड** | 13<br>(100 %) | 8<br>(20 %) | 104<br>(20 %) |

### उद्दिष्ट निहाय मुख्य निष्कर्ष

1. सदर संशोधनातून असे निष्पन्न झाले की, प्राथमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाची सद्यस्थिती अतिशय सकारात्मक असून सामान्यत: शिक्षकांच्या व्यवसायिक समाधानाचा स्तर उच्च दर्जाचा (Very Good) दिसून आला.
2. प्राथमिक शिक्षकांपैकी अपवादात्मक एकाही शिक्षकाचे व्यवसायिक समाधान स्तर निकृष्ट (Poor) किंवा अतिनिकृष्ट (Very Poor) दर्जाचे व्यावसायिक समाधान या स्तरावर कोणताही प्राथमिक शिक्षक नसल्याचे समाधानकारक चित्र सुस्पष्ट झाले.
3. तरीपरंतू अगदीत्याचवेळी किमान आणि कमाल सेवानुभवी प्रत्येकी 4 टक्के शिक्षकांचा वर्ग अगदी सुमार दर्जाचे (Average) व्यावसायिक समाधान अनुभवतांना दिसतोय.
4. प्राथमिक शिक्षकांपैकी - मध्यम स्तर व्यावसायिक समाधान प्राप्त करणाऱ्या शिक्षकांमध्ये कमी सेवानुभवी शिक्षकांपेक्षा सेवाजेष्ठ शिक्षकांचीच संख्या तुलनेने अधिक आहे.
5. कमाल शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांमध्ये मध्यम (Good) व उच्च (Very Good) दर्जाचे व्यावसायिक समाधानच दिसून येते.
6. किमान शिक्षितांचा एक बऱ्यापैकी मोठा गट (4 टक्के) अद्यापही सुमार दर्जाचे (Average) व्यावसायिक समाधान अनुभवतोय हेही याठिकाणी स्पष्ट झालेय.

7. पुरूषवर्गाच्या बाबतीमध्ये मध्यम दर्जाचे (Good) समाधान प्राप्त करणारा 33 टक्के इतकामोठा वर्ग दिसून येतो.
8. तरीसुद्धा उच्चदर्जाचे (Very Good) व्यावसायिक समाधान प्राप्त करणारा पुरूषवर्ग 65 टक्के आणि महिलावर्ग 70 टक्के ही आकडेवारीसद्धा शिक्षणक्षेत्राचे आशादायक चित्र उभे करते.

## महत्त्वाच्या निष्कर्षाशी पूर्ण संशोधनाची चर्चा

1 प्राथमिक शिक्षण व्यवसायातून उच्च दर्जाचे (Very Good) व्यवसाय समाधान प्राप्त असणाऱ्या शिक्षकांचीच संख्या बहूसंख्येने दिसून आली.

2 उच्च दर्जाच्या (Very Good) व्यवसाय समाधान प्राप्तीमध्ये पुरुष शिक्षकांपेक्षा महिला शिक्षकाच बहूसंख्येने दिसून आल्या.

3 महिला व पुरुष शिक्षक यांबाबत सामान्य दर्जा (Avarage) व्यवसाय प्राप्तीमध्ये समसमान संख्या दिसून आली.

4 मध्यम दर्जाचे (Good) व्यवसाय प्राप्तीमध्ये कमाल शिक्षित शिक्षकच किमान शिक्षित शिक्षकांच्या तुलनेत अधिक संख्येने दिसून आले.

5 सेवाजेष्ठ शिक्षकांच्या तुलनेत किमान सेवा असणाऱ्या शिक्षकांची संख्या उच्च दर्जाच्या (Very Good) समाधान प्राप्तीमध्ये अधिक दिसून आली.

6 निकृष्ट (Poor) किंवा अतिनिकृष्ट (Very Poor) दर्जाचे व्यावसायिक समाधान या स्तरावर कोणताही प्राथमिक शिक्षक नसल्याचे समाधानकारक चित्र सुस्पष्ट झाले.

## घटकनिहाय शिफारशी

1. शाळा व्यवस्थापन समिती व शालेय सहकारी तसेच प्रशासण ह्यांची महिलांविषयीची भुमीका अधिक सकारात्मक व सवहार्दपुर्ण असावी.
2. शालेय प्रशासनात सहकार्यांचे मत पुरेपूर जाणून घेतले जावे यावर विशेष भर हवा
3. शालेय प्रशासन हे संपूर्णपणे नि:पक्षपाती व तटस्थ असावे
4. सेवाजेष्ठांच्या सेवेच्या अनुभवाचा तसेच कमाल शिक्षीतांच्या उच्च शिक्षणाचा शालेय कामकाजात यथोचित व पुरेपूर वापर करुन घेवून त्यांना योग्य तो न्याय आणि वाव दिला गेला पाहिजे.
5. अनुभवाने व शिक्षणाने तुलनेने कमी असणाऱ्या लोकांना दुजेपणाची वागणूक न देता उलट त्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य करुन प्रगतीची आणि अधिकाधिक सेवेची संधी उपलब्ध करुन द्यावी.
6. सहकार्यांनी परस्परांच्या सुख दु:खात कोणताही भेदभान न करता सहभागी व्हावे परस्परांच्या अडीअडचणींना समजून घ्यावे.
7. शाळेमध्ये केवळ प्रशासनचाच वापर न करता व्यवस्थापनाला पुरेपूर वाव द्यावा.

८. कामानुसार वेतन व समान काम समान वेतन हे तत्व सध्या कंत्राटी भरतीमुळे लोप पावलेले दिसते ते पुनरुज्जिवीत करावे. व शिक्षकांना त्यांचा योग्य सामाजिक व शैक्षणिक दर्जा राखता यावा. यासाठी पुरेसे वेतन बिनशर्त मिळावे.